7.1.1 :Programs promoting Gender Equity

| Year | Title of the Program | Date & duration (From-to) | Number of participants by Gender | |
|---|---|---|---|---|
| | | | Female | Male |
| 2022 | "Gavasani Kshitijala" Mahila Sabalikaran aani sashaktikaran | 15 feb 2022-18 feb 2022 | 27 | - |
| 2022 | Yuvak Yuvati Unnattikaran | 25-Mar-22 | 7 | 15 |



1

"खुले व्यासपीठ-चर्चासत्र" Date:- 18/02/2022

7.1.1 Prog (2)
Gender equity.

श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे -०२ चे
स.भू.बा.ऊर्फअप्पासाहेबजेधे महाविद्यालय पुणे-२
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणेचे समाजभूषण बाबुराव उर्फ आप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पुणे-२.
आवक क्र. 9६3८/2021-22
तारीख 9८/03/2022
फाईल क्र.

अहवाल गवसणी क्षितीजाला" - महिला सबलीकरण आणि सशक्तीकरण- १५ ते १८ फेब्रु. २०२२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे औचित्य साधून आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत विद्यार्थिनी साठी "गवसणी क्षितीजाला" महिला सबलीकरण आणि सशक्तीकरण या कार्यशाळेचे आयोजन दिनांक १५ ते १८ फेब्रुवारी २०२२ या कालावधीमध्ये आभासी (online) व प्रत्यक्ष (Offline) पद्धतीने करण्यात आले. विद्यार्थीनीना शिक्षणाबरोबर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक गोष्टींचे आकलन व्हावे, विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास व्हावा, काळानुसार बदलणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठीची क्षमता निर्माण व्हावी, त्यांना आपले विचार मांडण्यासाठी खुले व्यासपीठ मिळावे हे या कार्यशाळा आयोजनामागचे प्रयोजन होते.

या कार्यशाळेमध्ये पुढील मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. दिनांक १५ फेब्रवारी २०२२ या दिवशी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय पं. गायकवाड यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. या प्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय पं. गायकवाड यांनी या कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या तसेच महाविद्यालयातील विद्यार्थीनिनी आपल्या स्वप्नांचे पंख पसरून क्षितिजाला गवसणी घालावी व आपली स्वप्न साकार करावीत. या कार्यासाठी महाविद्यालय सदैव तत्पर असेल असे आश्वासन दिले.प्रा.रजनी जरांडे यांनी क्षितीजाला गवसणी घालताना.... या विषयी विद्यार्थिनीना मार्गदर्शन करताना स्वतः स्वप्नांना इतकी उंच भरारी द्या, ज्यातून क्षितिज देखील ठेंगणे वाटेल असे विचार माडले. स्वतःच्या आत्मविश्वासाच्या जोरावर एक स्त्री किती उंच भरारी घेऊ शकते हे सावित्रीबाई फुले, जिजामाता, सिंधुताई सपकाळ, लता मंगेशकर इत्यादि यांच्या जीवनातील विविध पैलूंच्या आधारे त्यांनी महिलांचे कर्तृत्व स्पष्ट केले. प्रा. ज्योती शिंदे यांनी आर्थिक साक्षरता: महिला सबलीकरणाचा पाया या विषयी मार्गदर्शन करताना विद्यार्थीनींनी आजच्या आधुनिक काळात वावरत असताना आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे आहे, बँकांमध्ये महिलांसाठी असलेल्या विविध संधी, बचत योजना, गुंतवणूक करण्याच्या पद्धती या बद्दल माहिती दिली.

दिनांक १६ फेब्रवारी २०२२ या दिवशी डॉ. सविता कुलकर्णी यांनी "व्यक्तिमत्व विकास करताना" महाविद्यालय, समाज, आणि कुटुंब यांच्यातील सहसंबंध यांचे महत्व सांगितले. तसेच व्यक्तिमत्व घडविताना बाह्य व अंतर्गत व्यक्तिमत्व पूर्णपणे वेगळे असते परंतु त्यांची योग्य सांगड घालता आली पाहिजे, हे त्यांनी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले, राष्ट्रीय सेवा योजनामुळे व्यक्तीच्या अंगी असलेले विविध कलागुण, कौशल्य, सामाजिक बांधिलकी याची विद्यार्थ्यांना जाणीव होते आणि या संदर्भात राष्ट्रीय सेवा योजना हे सर्वात प्रभावी व्यासपीठ असून त्याचा विद्यार्थ्यांनी सदुपयोग करून घ्यावा असे मत माडले. महाविद्यालयातील प्रा. डॉ. दिपक सुरवसे यांनी "राष्ट्रीय सेवा योजना आणि जडणघडण" या विषयावर बोलताना विद्यार्थ्यांची जडणघडण होण्यास तसेच आत्मविश्वास संपादन करून समाजातील नवीन आव्हाने पेलण्यास, समाजातील प्रत्येक घटकास मदत करण्यास राष्ट्रीय सेवा योजना विभाग सतत प्रेरणा देत असतो असे मत माडले तसेच महाविद्यालयीन अवस्थेत असताना प्रत्येक विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचा भाग व्हावा असे आवाहन केले.

दिनांक १७ फेब्रवारी २०२२ प्रा. डॉ. अमित गोगावले यांनी "यशाची पहिली पायरी-राष्ट्रीय सेवा योजना" या विषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते स्वतः विद्यार्थी असताना राष्ट्रीय सेवा योजनेचा भाग झाल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वात भर घालणारे संभाषण कौशल्य, निर्णय क्षमता, लोककला सादरीकरण अशा विविध पैलूंचा कसा विकास



2

झाला हे सांगितले तसेच त्यांनी या विषयी सदरीकरण केले तसेच या माध्यमातून आपला विद्यार्थी एक यशस्वी वाटचाल सहज करू शकतो हा आत्मविश्वास दिला. डॉ. नाना शेजवळकर यांनी "राष्ट्रीय सेवा योजना आणि औद्योगिक संधी" या विषयी बोलताना राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात भाग घेऊन आपण आपले व्यक्तिमत्व घडवू शकतो आणि या शिबिरात आपणास शिकविलेल्या अनेक कल्पना ह्या तुम्हाला औद्योगिक क्षेत्रात पदार्पण करताना उपयोगी पडू शकतात. औद्योगिक क्षेत्रामध्ये असणाऱ्या संधीचा वापर करताना राष्ट्रीय सेवा योजनेची महत्वाची भूमिका स्पष्ट केली.

दिनांक १८ फेब्रुवारी २०२२ या दिवशी "खुले व्यासपीठ – मला काही बोलायचे...." या संकल्पनेद्वारे मुलींनी आधुनिक स्त्रियांची बदलती परिस्थिती, स्त्रीचा खरा शत्रू कोण?, लव मॅरेज की अरेंज मॅरेज, भावी जोडीदार, आभासी सामाजिक प्रसार माध्यमांमध्ये स्त्रीयांची बदलत चाललेली रूपे, या विषयांवर स्वतःची परखड मते मांडली. या वेळी गटचर्चा, वाद विवाद आणि सह विचार सभा घेण्यात आली सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील एकूण ९६ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

"गवसणी क्षितीजाला -महिला सबलीकरण आणि सशक्तीकरण" या कार्यशाळेस श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे -०२ चे सर्व पदाधिकारी व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय पं. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. शिवाजी पाचारणे, डॉ. विशाल गायकवाड, डॉ. दीपक सुरवसे, डॉ. अमित गोगावले, प्रा. रजनी जरांडे, प्रा. सीमा कांबळे, प्रा. शितल वाघमारे, प्रा. ज्योती शिंदे, प्रा. स्नेहल जगताप, प्रा. सोनाली खरटमल तसेच महाविद्यालयातील इतर सर्व प्राध्यापक वर्ग यांचे सहकार्य लाभले.

| | | |
|---|---|---|
| प्रा. रजनी जरांडे<br>(कार्यक्रम अधिकारी) | डॉ. शिवाजी पाचारणे<br>(जिल्हा समन्वयक) | डॉ. संजय पं. गायकवाड<br>प्रभारी प्राचार्य<br>स. भू. बा. उर्फ आप्पासाहेब जेधे<br>कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय<br>पुणे-४११००२. |

"गवसणी क्षितीजाला" - महिला सबलीकरण आणि सशक्तीकरणकार्यशाळा–क्षणचित्रे







3

"खुले व्यासपीठ -चर्चासत्र" Date:- 18/02/202

"गवसणी क्षितीजाला" - महिला सबलीकरण आणि सशक्तीकरणकार्यशाळा–क्षणचित्रे













4

"खुले व्यासपीठ-चर्चासत्र" Date:- 18/02/202

"गवसणी क्षितीजाला" - महिला सबलीकरण आणि सशक्तीकरणकार्यशाळा-क्षणचित्रे









प्रा. रजनी जरांडे
(कार्यक्रम अधिकारी)

डॉ. शिवाजी पाचारणे
(जिल्हा समन्वयक)

डॉ. संजय पं. गायकवाड
**प्रभारी प्राचार्य**
स. भू. बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२.



5

Date: 18/02/20..

"खुले व्यासपीठ चर्चासत्र"

विद्यार्थ्याचे नाव    मो. नं    सही

(मुक्त विचार मांडलेल्या मुली)

Name.    Topic.    9/02/2022

1. अंकिता संजय खिलारे — Arrange Marrige.
2. प्रतिक्षा विठ्ठल डांगे — Arrange marrige / मुलींचे वर्तणूक
3. सोनाली उत्तेकर — Life partner (Castism)
4. ऋषा कसबे — Attraction (Love-Arrange M).
5. मनस्वी सुरवसे — मुलींचा ड्रेसकोड
6. स्नेहल परब — आधुनिक स्त्रियांची बदलती परिस्थिती.
7. नम्रता मोजर — Arrange marrige
8. श्यामबाला कोळेकर —
9. महादेवी माने — Family Freedom.
10. नंदिनी मुळे — Social media.
11. ★ प्रज्ञा खाडेगावकर — जातिव्यवस्था / स्त्रियांचा स्वरक्षण कोठ)

"खुले व्यासपीठ -चर्चासत्र" Date: 18/02/2022

| विद्यार्थ्यांचे नाव | मो. नं | सही |
|---|---|---|
| 1 सोनाली उदेकर | 7558491810 | S.udekAR |
| 2 समृध्दी धानेपकर | 9359038356 | samruddhi |
| 3 अर्चना केळेकर | 8329133781 | Archana |
| 4 स्नेहल परब | 9307776408 | Parab |
| 5 प्रज्ञा बाडिगांवकर | 7499437874 | Bhadigaonkar |
| 6 ईशा कसबे | 8668488327 | Kasabe |
| 7 अंकिता खिलारे | 9881148286 | Khilare |
| 8 नम्रता मोझर | 7350250731 | [illegible] |
| 9 [illegible] कुळे | 9922662693 | [illegible] |
| 10 तनुजा वामने | 9503033450 | tanuja |
| 11 मिनाक्षी शिंदे | 8626068259 | Minakshi |
| 12 शामबाला कोळेकर | 9356558720 | Kolekar |
| 13 रणदिवे संस्कृती सुधीर | 7720897689 | Sanskruti |
| 14 डांगे प्रतिक्षा विठ्ठल | 8975709235 | Dange |
| 15 नवले पौर्णिमा वसंत | 8010406277 | [illegible] |
| 16 साक्षी कृष्णा जाधव | 8010680892 | S.K.Jadhav. |
| 17 आश्विनी राजेंद्र कोथावळे | 7058518952 | Kothawale |
| 18 पोर्णिमा लक्ष्मण वल्लाळ | 8329940563 | [illegible] |
| 19 प्रज्ञा श्रीरंग कोटा | 8830246479 | P.S.Kota |
| 20 मनस्वी गोरख सुरवसे | 7972557449 | [illegible] |
| 21 साक्षी मिलेश डोंगडे | 8530175853 | [illegible] |
| 22 दिक्षा बळीराम मोहीते | 9028235008 | Diksha |
| 23 महादेवी दत्ता माने | 7972352394 | Mahadevi |
| 24 आरती कुंदन वल्लाळ | 7038212641 | [illegible] |
| 25 निकीता दत्तात्रय जाधव | 8805519857 | N.Jadhav |
| 26 पायल लक्ष्मण कवडे | 8999687791 | Payal kawade |
| 27 पार्वती निमा गुलाल | 9529351985 | [illegible] |



7

# * अहवाल *

आज दिनांक १५ फेब्रुवारी 2022 रोजी आपल्या, आप्पासाहेब जेधे महाविद्यालयात, "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे औचित्य साधून, "गवसणी क्षितीजाला" या शिर्षकाखाली, 'महिला सबलीकरण आणि सशक्तीकरण" या कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आभासी पद्धतीने (online) पद्धतीने घेतलेले आहे.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विशाल गायकवाड यांनी केले. तसेच कार्यक्रमाला उद्देश मार्गदर्शनपर भाषण महाविद्यालयाचे प्र.प्रा. डॉ. संजय गायकवाड सर यांनी केले. अगदी मोजक्या शब्दांत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि शुभेच्छा दिल्यां. पुढील सत्रात महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील प्रा. रजनी जराडे आणि प्रा. ज्योती शिंदे यांनी अनुक्रमे गवसणी क्षितीजाला, आणि आर्थिक साक्षरता-महिला सबलीकरणाचा पाया या विषयांसनुसन व्याख्याने देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शनाचे काम डॉ. विशाल गायकवाड सर यांनी पार पाडले. विद्यार्थ्यांना विषयांचे महत्त्व समजून सांगताना डॉ. शिवाजी पाचारणे सर यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास ~~आर्ट्स~~ कला, वाणिज्य विज्ञान विभागातून एकूण विद्यार्थी 75 उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन नियोजित वेळेत पूर्ण होण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक आभासी पद्धतीने उपस्थितीत होते. ~~सर्वांचे~~



8

श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणेचे
समाजभूषण बाबुराव उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पुणे-२
आवक क्र. ९६८५/२०२१-२२
तारीख २८/०३/२०२२
फाईल क्र.

अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सहयोगाने श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणे -०२ चे स.भू.बा.उर्फ अप्पासाहेब जेधे महाविद्यालातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित
युवक युवती उन्नायानिकरण कार्यक्रम अंतर्गत एक दिवसीय विद्यापीठ स्तरीय पथनाट्य प्रशिक्षण व सादरीकरण कार्यशाळामतदार जागृती अभियान ( मतदात जागृती अभियान) - शुक्रवार दिनांक २५ मार्च २०२२

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सहयोगाने स.भू.बा.उर्फ अप्पासाहेब जेधे महाविद्यालातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत दिनांक २५ मार्च २०२२ रोजी युवक युवती उन्नायानिकरण कार्यक्रम अंतर्गत एक दिवसीय विद्यापीठ स्तरीय पथनाट्य प्रशिक्षण व सादरीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेमध्ये एकूण पुणे व पिंपरी परिसरातील १३ महाविद्यालयातील १८२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सध्याच्या डिजिटल समाज माध्यमाच्या दुनियेमध्ये खऱ्या आणि खोट्या माहितीचा झपाट्याने होणाऱ्या प्रसारामध्ये पथनाट्याद्वारे समाजातील वास्तवादी खरी परिस्थिती मांडता यावी, अभिनयामध्ये रुची असणाऱ्या विद्यार्थ्यांना अभिनयाचे बाळकडू विद्यार्थी दशेतच मिळावे व त्याची सुरुवात पथनाट्यापासून व्हावी, जे विद्यार्थी आधीपासून पथनाट्य सादरीकरण करतात त्यांच्या कौशल्यामध्ये अजून भर पडावी हा या कार्यशाळा नियोजनामागील उद्देश होता आणि तो सफल झाला.हि कार्यशाळा ३ सत्रामध्ये आयोजित करण्यात आली होती.प्रथम सत्रामध्ये प्रा. अरुण शिंदे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन केले. उद्घाटन प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना पथनाट्याची सुरुवात जितकी प्रभावी तसेच त्याचा शेवट देखील तितकाच प्रभावी असणे आवश्यक आहे, हे त्यांचे अनुभव अभिनयतून साकार करून दाखविले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गायकवाड यांनी अध्यक्षस्थान वरून बोलताना राष्ट्रीय सेवा योजनेतून युवकांना या प्रकारचा मंच उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे यातून तरुण पिढी समाजाला चांगला मार्ग दाखउ शकते आणि या साठी तरुणाच्या हातात पथनाट्य या सारखे उत्कृष्ठ मध्यम आहे. या सत्राचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.नितीन मोटे, रितेश पाटील यांनी पथनाट्यामध्ये कोणत्या महत्त्वाच्या गोष्टी असाव्यात हे सांगितले. सामाजिक प्रश्नांची निवड व त्या साठी उत्तराचा पर्याय तसेच आपले पथनाट्य लोकांच्या जाणीवेला हात घालणारे असावे आणि समाजभान निर्माण करणारे असावे असे मत जिल्हा समन्वयक डॉ. शिवाजी पाचारणे यांनी मांडले.

कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये पथनाट्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून प्रशिक्षण देण्यात आले.प्रा.डॉ.नितीन मोटे यांनी अभिनय शब्द फेक व अभिनय प्रात्यक्षिक या विषयावर संवाद साधताना विविध पोवाड्याचा वापर,कवितेचा वापर,चित्रपटातील गाण्याचा वापर पथनाट्यामध्ये योग्य पैकी कसा करावा हे सांगितले व डॉ. अमित गोगावले यांनी देहबोली याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. अॅड. रितेश पाटील यांनी संहिता लेखन या विषयी मार्गदर्शन करताना पथनाट्यामध्ये सादरीकरण प्रभावी होण्यासाठी पथनाट्याचे लेखन देखील तितक्याच प्रभावी पणे होणे आवश्यक आहे हे संहिता लेखनाच्या काही उदाहरणातून स्पष्ट केले. तृतीय सत्रामध्ये कार्यशाळेमध्ये सहभागी झालेल्या महाविद्यालयाच्या पथनाट्याची स्पर्धा पार पडली यामध्ये एकूण ८ संघांनी सहभाग नोंदवला होता. मतदान जागृती, डिजिटल शिक्षण, अंधश्रधा निर्मुलन यासारखे विषय पथनाट्याच्या सदरीकरणासाठी देण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये प्रथम ३ क्रमांक व २ संघ उत्तेजनार्थ म्हणून निवडण्यात आले. प्रथम पारितोषिक श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाने पटकावला.

या प्रसंगी मा. प्रशांत कसबे साहेब, निवडणूक अधिकारी, कसबा विधानसभा मतदार संघ, यांनी वरील सर्व विद्यार्थ्यांना मतदार जागृती अभियान अंतर्गत विविध स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.

सदर कार्यशाळा आयोजनासाठी श्री शिवाजी मराठा सोसायटीचे सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. संजय गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. संयोजक म्हणून डॉ. शिवाजी पाचारणे यांनी जबाबदारी सांभाळली. डॉ. दीपक सुरवसे, डॉ. विशाल गायकवाड, डॉ. अमित गोगावले प्रा. रजनी जराडे यांनी कार्यक्रम अधिकारी म्हणून तर प्रा. मंगेश जाधव, प्रा. संतोष यादव, प्रा. धनाजी भिसे, प्रा. ज्योती जाधव, प्रा. नितिन गायकवाड, प्रा. स्नेहल जगताप, प्रा. सीमा कांबळे यांनी समिती सदस्य म्हणून उत्कृष्ठ नियोजन केले.

डॉ. शिवाजी पाचारणे

**PROGRAMME OFFICER**
**NATIONAL SERVICE SCHEME**
S.B.B. alias Appasaheb Jedhe
Arts, Commerce & Science Coll.
Pune - 411 002

डॉ. दिपाली रा. पाटील
प्रभारी प्राचार्य
स.भू.बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२.



9

श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणेचे
समाजभूषण बाबुराव उर्फ अप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पुणे-२.
आवक क्र. ९६०५/२०२१-२२
तारीख ...२६/०३/२०२२
फाईल क्र

शिबिर अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,

समाजभूषण बाबुराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने

**विशेष श्रमसंस्कार शिबीर 2021-22 ( 23 फेब्रुवारी 2021 ते 01 मार्च 2022 )**

श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणे - ०२ चे समाजभूषण बाबुराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे श्रम संस्कार शिबिर दिनांक 23 फेब्रुवारी 2021 ते 01 मार्च 2022 कालावधीत मु.पो.मोहरी, ता. भोर पुणे या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते सदर शिबिरामध्ये खालील प्रमाणे उपक्रम राबविण्यात आले. 23/02/2022 रोजी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मोहरी गावचे सरपंच श्री दत्तात्रेय झांजले, ग्रामपंचायत सदस्य व इतर पदाधिकारी तसेच भोर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मा.विठ्ठल दाबडे तसेच सिद्धाश्रमचे व्यवस्थापक बापू लेकावळे व महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सजन गायकवाड यांच्या उपस्थितीमध्ये उद्घाटन समारंभ संपन्न झाला. उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिबिर कालावधीमध्ये येणारे अनुभव आयुष्याला कलाटणी देणारे असतात तसेच हा अनुभव व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी अतिशय महत्त्वाचा आहे याबद्दल मार्गदर्शन केले तसेच शिबिर कालावधीमध्ये शिस्तीचे पालन करावे अशी देखील सूचना केल्या. दुपारच्या जेवणानंतर स्वयंसेवकांनी सिद्धाश्रमाचा संपूर्ण परिसर स्वच्छ केला तसेच गावामध्ये जनजागरण पर रॅली काढण्यात आली होती. सायंकाळी जेवणानंतर युवा व्यासपीठ म्हणून विद्यार्थ्यांनी स्वतःचा परिचय करून दिला.

**24/02/2022** शिबिराच्या दुसऱ्या दिवशी स्वयंसेवकांनी मोहरी गावात संपूर्ण गावात स्वच्छता अभियान राबवले तसेच घरोघरी जाऊन स्वच्छते विषयी जनजागरण केले दुपारच्या व्याख्यान सत्रामध्ये मा. गणेश गोगावले गणितज्ञ हे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना गणितामधील महत्त्वाची सूत्रे व त्याबाबतचे सखोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. सायंकाळी जेवणानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

**25/02/2022** शिबिराच्या तिसऱ्या दिवशी गावातील सार्वजनिक चिकू व सिताफळाच्या बाग याठिकाणी झाडांची आळी करणे तसेच झाडांच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करणे व झाडांना पाणी देणे अशा स्वरूपाची कामे केली. दुपारच्या व्याख्यानाच्या सत्रामध्ये मा. संजीव भोसले यांनी काव्यरचना आणि ग्रामीण अनुभव तसेच मा. समाजी कांबळे यांनी गीते, संगीत आणि संस्कृतीचे आपल्या विविध गीते व गजल मधून विनोदी शैलीतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सायंकाळी जेवणानंतर विद्यार्थ्यांमध्ये गटचर्चा तसेच सॉफ्ट स्किलचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

**26/02/2022** शिबिराच्या चौथ्या दिवशी विद्यार्थ्यांनी गावातील अमृतेश्वर मंदिराचा संपूर्ण परिसर स्वच्छ केला. दुपारच्या व्याख्यान सत्रामध्ये ॲड. रितेश पाटील (माजी विद्यार्थी) आणि प्रा. श्री माने यांनी सॉफ्ट स्किल माध्यमातून विद्यार्थ्यांना आपले व्यक्तिमत्व कशा प्रकारे विकसित करता येतील याचे प्रात्यक्षिक दाखवले. तसेच सर्पमित्र श्री मनोज वाघ व त्यांचे सहकारी यांनी विद्यार्थ्यांना सापांविषयी असणारे समज आणि गैरसमज याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सायंकाळी जेवणानंतर गावामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमात श्री अनिल कुंभार यांनी भारुडाच्या माध्यमातून जनजागृती केली. सदर भारुडाला गावातील ग्रामस्थांकडून मोठा प्रतिसाद मिळाला.

आरोग्य तपासणी शिबीर:- अनंतराव थोपटे फार्मसी महाविद्यालय, भोर यांच्या सहयोगाने **26/02/2022** रोजी सायंकाळी शिबीर स्थळी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले. यात ब्लड प्रेशर, पल्स, तापमान, साखर, आणि सांधेदुखी यांच्या तपासण्या करण्यात आल्या. ९६ नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

**पल्स पोलिओ अभियानात स्वयं:सेवकांचा सहभाग:** गावातील जास्तीत जास्त छोटी मुले पोलिओ आजारापासून दूर राहावीत आणि त्यांनी डोस घ्यावा या साठी प्रत्येक घरात जाऊन पल्स पोलिओ अभियानासंदर्भात माहित सांगितली व छोट्या मुलांना पोलिओ डोस केंद्रापर्यंत पोहचविले. तसेच या केंद्रावर आशा यांना मदत केली.



10

27/02/2022 शिबिराच्या पाचव्या दिवशी विद्यार्थ्यांनी गावातील जिल्हा परिषदेची शाळा स्वच्छ केली तसेच शाळेच्या प्रांगणामध्ये खो-खो व कबड्डीचे ग्राउंड तयार करून दिले. दुपारच्या व्याख्यान सत्रामध्ये जागतिक मराठी भाषा दिनानिमित महाविद्यालयाचे प्राध्यापक धनाजी भिसे हे उपस्थित राहून मराठी मातृभाषेविषयी असणारे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. सध्याकाळी जेवणानंतर ग्रामस्थासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत किर्तन आयोजित करण्यात आले होते. सदर कीर्तन श्री स्वामिरज भिसे यानी केले. सदर किर्तनाला देखील गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सामाजिक आर्थिक सर्वेक्षण: विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य वाढावे, ग्रामीण जीवन, राहणीमान जवळून पाहता यावे आणि समस्या समजून याव्यात तसेच माहिती संकलन व्हावी या साठी विद्यार्थाकडून ग्राम सर्वे करून घेण्यात आला.

28/02/2022 शिबिराच्या सहाव्या दिवशी विद्यार्थ्यांनी सिद्धाश्रम परिसरातील झाडांना व भिंतींना रंग देऊन आश्रमाचा परिसर सुशोभित केला. दुपारच्या व्याख्यान सत्रामध्ये प्रा. गणेश मध्ये यांनी भौगोलिक माहिती आधुनिक मापके आणि गावाचा विकास आराखडा कसा तयार केला जातो याबाबतचे मार्गदर्शन केले. संध्याकाळी जेवल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना देखील सहभागी करून घेण्यात आले होते त्या विद्यार्थ्यांचे नृत्य आपल्या विद्यार्थिनीने बसवले होते. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सुरुवातीला भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर सांस्कृतिक कार्यक्रमाला गावातील संपूर्ण ग्रामस्थ सहभागी झाले होते.

पुस्तक भेट: उल्लेखनीय बाब म्हणजे महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांनी आपणाकडील जुनी परंतु चांगल्या विचारांची पुस्तके व शाळा उपयोगी साहित्य ( अंदाजे किमंत सात हजार रु.) तेथील प्राथमिक शाळेस भेट दिले.

01/03/2022 शिबिराच्या सातव्या दिवशी विद्यार्थ्यांनी पक्षायतीच्या सहाय्याने ग्राम सर्वेक्षण करण्यात आले. सायंकाळी शिबीराचा समारोप समारंभ आयोजित करण्यात आला होता सदर समारोपास मोहरी गावचे ग्रामपंचायत धामोरी गावचे सरपंच दत्तात्रय झांजले बापू लेकावळे व इतर गावातील पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते विद्यार्थ्यांनी शिबिरा आलेले अनुभव प्रातिनिधिक स्वरूपात व्यक्त केले.

सदर शिबिर आयोजनासाठी श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणे -०२ चे सर्व अधिकारी तथा पदाधिकारी व महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. संजय यांच्या सूचना व मार्गदर्शन यामुळे शिबिर अतिशय शिस्तीच्या वातावरणामध्ये यशस्वी संपन्न झाले.

सदर शिबीर आयोजनासाठी श्री शिवाजी मराठा सोसायटीचे सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. संजय गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. संयोजक म्हणून डॉ. शिवाजी पाचारणे यांनी जबाबदारी सांभाळली. डॉ. दीपक सुरवसे, डॉ. विशाल गायकवाड, डॉ. अमित गोगावले, प्रा. रजनी जराडे यांनी कार्यक्रम अधिकारी म्हणून तर प्रा. मंगेश जाधव, प्रा. संतोष यादव, प्रा. अरुणा गरुड, प्रा. ज्योती वाघमारे, प्रा. शितल गायकवाड, प्रा. स्नेहल जगताप, प्रा. सीमा कांबळे, प्रा. सोनाल खरटमल, प्रा. साळुंके, प्रा. सुतार तसेच श्री खताळ. यांनी समिती सदस्य म्हणून उत्कृष्ट नियोजन केले.

डॉ. शिवाजी पाचारणे
PROGRAMME OFFICER
NATIONAL SERVICE SCHEME
S.B.B. alias Appasaheb Jedhe
Arts, Commerce & Science College
Pune - 411 002.

डॉ. दिपाली स. पाटील
प्रभारी प्राचार्य
श.भू.बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२.

श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणे -०२ चे

# स.भू.बा.ऊर्फअप्पासाहेबजेधे महाविद्यालय पुणे-२

श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणेचे
समाजभूषण बाबुराव उर्फ अप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पुणे-२.
आवक क्र. १६०५/२०२१-२२
तारीख ०६/०३/२०२२
फाईल क्र

## आहवाल – राष्ट्रीय सेवा योजना – नियमित कार्यक्रम सन २०२१-२२

➢ कोविड- १९ प्रतिबंधक लसीकरण मोहीम २०२१ ( मिशन युवा स्वास्थ्य )

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार आणि आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका यांच्या सहकार्याने **श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणे -०२** च्या सर्व वरिष्ठ महाविद्यालयीन शाखांच्या वतीने **"मिशन युवा स्वास्थ्य"** अंतर्गत कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण (Covishield) मोहीम शुक्रवार दि. २९ ऑक्टोबर २०२१ रोजी समाजभूषण बाबुराव उर्फ अप्पासाहेब जेधे महाविद्यालय, पुणे- ०२ येथे आयोजित करण्यात आली. या मोहिमेत ९० लोकांचे लसीकरण झाले. या प्रसंगी श्री शिवाजी मराठा सोसायटीचे आदरणीय सन्माननीय पदाधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले.


शिवाजी मराठा सोसायटीतर्फे मोफत लसीकरण मोहीम





➢ 'माझी वसुंधरा' अभियानातर्गत हरित शपथ कार्यक्रमाचे आयोजन

महाराष्ट्र शासन आणि सा. फु. पुणे विद्यापिठ यांच्या सहयोगाने दिनांक १० ते २६ डिसेंबर २०२१ या कालावधीत 'माझी वसुंधरा' अभियानातर्गत हरित शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून महाविद्यालयातील २०० पेक्षा जास्त विद्यार्थीनी ई प्रमाणपत्र प्राप्त केले.


➢ राज्यस्तरीय ऑनलाईन संविधान प्रश्नमंजुषा "उपक्रम (०४ ते ३० नोव्हेंबर २०२१)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणे -०२ चे समाजभूषण बाबुराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे-०२, भूगोल विभाग, राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त दिनांक २४ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२१ या कालावधीत राज्यस्तरीय ऑनलाईन संविधान प्रश्नमंजुषा (https://forms.gle/KzArNWz7ExJACbge6) आयोजित करण्यात आली. सदर प्रश्न मंजुषा उपक्रमात ३० % किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणा-या सर्वांना ई- प्रमाणपत्र ( E- Certificate) त्यांच्या ई-मेल वर प्राप्त होईल अशी सोय केली. प्रत्येक दिवसी 100 प्रमाणपत्र वितरित झाली आहेत. या उपक्रमात जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घ्यावा या साठी Whatsaap मेसेज, तोंडी प्रचार आणि प्रसार केला आणि विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे राज्यभरातून अनेक महाविद्यालयातून व इतर ठिकाणाहून या उपक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक इतर नागरिक व कर्मचारी अश्या एकूण २०७० सहभागींनी गुगलफॉर्म च्या लिंक वरुन उत्स्फुर्त सहभाग घेऊन प्रश्नमंजुषा सोडविली. हा उपक्रमात यशस्वी करण्यासाठी प्र. प्राचार्य डॉ संजय वी. गायकवाड, प्रा. एच. डी. चलवादी, राज्यशास्त्र विभाग, डॉ. दिपक सुरवसे (कार्यक्रम अधिकारी), डॉ. विशाल गायकवाड जिल्हा समन्वयक (पुणे ग्रामीण), डॉ. अमित सोनावने यांचे सहकार्य लाभले. सुपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन डॉ. शिवाजी पाचरणे राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक (पुणे शहर) यांनी केले. वरील उपक्रम राबविण्यासाठी श्री शिवाजी मराठा सोसायटीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले.




12


सहभागी विद्यार्थी व इतर कर्मचारी





सहभागीसाठी उत्कृष्ठ प्रमाणपत्र




सहभागी विद्यार्थी व कर्मचारी




गुण विभाजन



➤ **संविधान दिन प्रस्ताविकेचे सामुहिक वाचन आणि व्याख्यान २८ नोव्हेंबर २०२१**









२८ नोव्हेंबर २०२१ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समवेत संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन घेण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय ध. गायकवाड यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले त्यांनी प्रगल्भ लोकशाही साठी संविधानाचे महत्व या विषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच या वेळी सर्व सहभागींनी प्रा. अमित गोगावले यांच्या समवेत प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन केले. 'मतदार राजा जागा हो' या संदर्भात डॉ. विशाल गायकवाड (कार्यक्रम अधिकारी) यांनी आपले विचार मांडले तर प्रास्ताविक डॉ. शिवाजी [illegible] यांनी केले. तसेच आभार प्रा. [illegible] सर यांनी मानले. या वेळी मैदानावर या उपक्रमात २७२ पेक्षा जास्त विद्यार्थी आणि ४४ प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

➤ उपक्रम :- **एड्स- समज आणि गैरसमज दिनांक :- ०३/१२/२०२१**

दिनांक ०१ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त आपल्या महाविद्यालयात 'पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था, पुणे' व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ०३ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ९.३० वाजता देशभक्त केशवराव जेधे सभागृहात एड्स- समज आणि गैरसमज या विषयावर व्याख्यान व जनजागरण उपक्रम घेण्यात आला.



13

उपक्रम :- मतदार जनजागृती अभियान दिनाक :- ०३/१२/२०२१

३ डिसेंबर २०२१ रोजी निवडणूक आयोग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये मतदार जनजागृती करण्याच्या हेतूने मतदार जनजागृती अभियान पर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी मतदार जनजागृती वर विशेष मार्गदर्शन प्रा. अमित गोगावले सर यानी केले. तसेच सदर अभियानाच्या आयोजनासाठी कार्यक्रम अधिकारी तथा जिल्हा समन्वयक डॉ. शिवाजी पाचरणे सर यांनी मार्गदर्शन केले या अभियानामध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ११० विद्यार्थी स्वयंसेवक सहभागी झाले होते. तसेच या अभियानाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. संजय गायकवाड यानी विशेष मार्गदर्शन केले. सदर उपक्रमाचे आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. दिपक सुरवसे डॉ. विशाल गायकवाड यानी केले

उपक्रम :- स्वच्छता अभियान-महाविद्यालय परिसर दिनाक :- ०५/१२/२०२१

०५ डिसेंबर डिसेंबर २०२१ रोजी वार्षिक नियमित कार्यक्रमा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयामध्ये स्वच्छता अभियान उपक्रम घेण्यात आला. सदर उपक्रमातर्गत महाविद्यालयाच्या १८ वर्ग खोल्या झाडून स्वच्छ केल्या व टेरेस व भिंती साफ केल्या. सदर स्वच्छता अभियानामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे ६३ स्वयंसेवक सहभागी झाले होते. स्वच्छता अभियानाच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.संजय गायकवाड सर यानी स्वच्छता विषयी व श्रमाच्या मूल्या विषयी मार्गदर्शन केले. स्वच्छता अभियानाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तथा जिल्हा समन्वयक डॉ. शिवाजी पाचरणे सर यानी मार्गदर्शन केले. या अभियानाचे आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ.विशाल गायकवाड , डॉ. दिपक सुरवसे , प्रा. डॉ. अमित गोगावले प्रा.शीतल पायमार व ज्योती वाघमारे यानी केले.

उपक्रम :- ई.वेस्टेज संकलन अभियान दिनाक :- १९/१२/२०२१

१९ डिसेंबर २०२१ रोजी वार्षिक नियमित कार्यक्रमातर्गत जनवाणी फाउंडेशन, पुणे महानगरपालिका व राष्ट्रीय सेवा योजना विभाग समाजभूषण बाबुराव उर्फ आप्पासाहेब जेधे महाविद्यालय यांच्या सयुक्त विद्यमाने वेस्टेज संकलन अभियान हे लोखंडी तालीम, पत्रकार भवन, शुक्रवार पेठ, टिळक रोड, शनिवारवाडा, शिवाजीनगर, स्वारगेट आणि सारसबाग परिसर व महाविद्यालय बाहेरील परिसर या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकाच्या वतीने हे वार्षिक संकलन अभियान घेण्यात आले. या उपक्रमामध्ये ४७ स्वयंसेवक सहभागी झाले होते. एकत्रित केलेले प्लास्टिक आणि ई. गार्बेज (ई कचरा) जनवाणी फाउंडेशन पुणे महानगरपालिका यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला . या उपक्रमाच्या निमित्ताने जनवाणी फाउंडेशन व पुणे महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यानी देखील उपक्रमाच्या ठिकाणी भेटी दिल्या तसेच सहभागी स्वयंसेवकाचे कौतुक केले व आपली महाविद्यालयाचे आभार व्यक्त केले. सदर उपक्रमाच्या आयोजनासाठी कार्यक्रम अधिकारी तथा जिल्हा समन्वयक डॉ.शिवाजी पाचरणे सर यांनी मार्गदर्शन केले सदर उपक्रमाचे आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. दिपक सुरवसे, डॉ. विशाल गायकवाड, प्र. डॉ. अमित गोगावले व प्रा.सीमा कावळे यानी केले.

उपक्रम :- सॅनीटायझेशन अभियान-महाविद्यालय परिसर दिनाक :- ०५/१२/२०२१ ते १९/१२/२०२१

०५ डिसेंबर ते १९ डिसेंबर २०२१ या कालावधित राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयामध्ये स्वच्छता अभियान उपक्रमअंतर्गत महाविद्यालय इमारतीचे सॅनीटायझेशन दि. ०५/०७/०९/११/१३,१५/१७ आणि १९ डिसेंबर २०२१ करण्यात आले. सदर उपक्रमातर्गत महाविद्यालयाच्या १८ वर्ग खोल्या व प्रांगण तसेच पायऱ्या या सर्वाचे सॅनीटायझेशन केले. सदर स्वच्छता अभियानामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे ३८ स्वयंसेवक सहभागी झाले होते. स्वच्छता अभियानाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तथा जिल्हा समन्वयक डॉ. शिवाजी पाचरणे सर यांनी मार्गदर्शन केले.

स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त युवा सप्ताहाचे उद्घाटन बुधवार दि. १२ जानेवारी २०२२

स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात युवा सप्ताहाचे उद्घाटन दि. १२ जानेवारी २०२२ रोजी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय प. गायकवाड यांच्या हस्ते झाले या वेळी त्यानी तरुणानी राष्ट्रीय सेवा योजना विभागातून समाज कार्य करून राष्ट्र उभारणीत मोलाचा सहभाग नोंदउ शकता आणि देशाच्या उन्नती साठी मनापासून प्रयत्न करू शकता या साठी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या विचारांची आणि कार्याची ऊर्जा ही तुमचे व्यक्तिमत्व घडवू शकते आणि म्हणून आपण या लोकांच्या विचारांची आणि कार्याची आठवण आपण सतत ठेवली पाहिजे. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवाजी पाचारणे यानी केले, युवा सप्ताहाची गरज का आहे ? या बाबत प्रा. अमित गोगावले यानी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच पुढे १५ दिवस चालणाऱ्या कार्यक्रमाची रूपरेषा डॉ. विशाल गायकवाड यानी मांडली आणि डॉ. दीपक सुरवसे यानी आभार मानले. सुपूर्ण कार्यक्रम कोविड निर्बंधामुळे ऑनलाईन पद्धतीने झूम प्लॅटफॉर्म व घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी ऑनलाईन पद्धतीने १०० विद्यार्थी व प्राध्यापक हजर होते.

मतदार साक्षरता अभियान- मतदार साक्षरता मंडळाची स्थापना

मतदार साक्षरता अभियान अंतर्गत महाविद्यालयात मतदार साक्षरता मंडळाची स्थापना करण्यात आली यात सहभागी विद्यार्थ्यांकडून निबंध, रील, पोस्टर्स तयार करून घेण्यात आले. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी आजून मतदार होण्यासाठी नोंदणी केली नाही त्याना या संदर्भात माहिती दिली. मतदानासदर्भात जन जागृती व्हावी यासाठी मतदार साक्षरता अभियाना अंतर्गत राष्ट्रीय मतदार दिवस ही साजर करण्यात आला

'राष्ट्रीय मतदार दिवस'- दिनांक २५ जानेवारी २०२२

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आणि श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे ०२, चे समाज भूषण बाबूराव उर्फ अप्पासाहेब जेधे महाविद्यालय यांच्या सयुक्त विद्यमाने आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनाक २५ जानेवारी २०२२ रोजी 'राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय प. गायकवाड यानी प्रमुख

3

...मार्गदर्शन केले त्यांनी या वेळी प्रगल्भ लोकशाही साठी सक्षम तरुण आणि मतदानाचा हक्क या बाबत जाणीव जागृती केली. तसेच या वेळी ... यांनी लोकशाहीवर निष्ठा ठेवणे संदर्भी शपथ घेतली या वेळी या शपथेचे वाचन प्रा. अमित गोसावले यांनी केले. 'मतदार राजा जागा' हो या ... डॉ. विशाल गायकवाड (कार्यक्रम अधिकारी) यांनी आपले विचार मांडले तर डॉ. शिवाजी पाचारणे (जिल्हा समन्वयक व कार्यक्रम अधिकारी) 'लोकशाही ... आणि निवडणूक' या बाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व प्रास्ताविक प्रा. रजनी जराडे (कार्यक्रम अधिकारी) यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. दीपक सुरवसे यांनी केले (कार्यक्रम अधिकारी) संपूर्ण कार्यक्रम कोविड निर्बंधामुळे ऑनलाईन पद्धतीने झूम प्लाटफोर्म वर घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी ऑनलाईन पद्धतीने ८७ विद्यार्थी व प्राध्यापक हजार होते.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वरील सर्व नियमित उपक्रम राबविण्यासाठी श्री शिवाजी मराठा सोसायटीचे आदरणीय सन्माननीय पदाधिकारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

सावित्री महोत्सव – दिनांक १४ फेब्रुवारी

राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण मंडळ यांच्या सहयोगाने सावित्री महोत्सवाचे आयोजन केले होते या निमित्ताने प्रा. स्नेहा गायकवाड यांचे सावित्री समजून घेताना या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

"गवसणी क्षितीजाला" - महिला सबलीकरण आणि सशक्तिकरण

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे औचित्य साधून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गतविद्यार्थिनींसाठी गवसणी क्षितीजाला महिला सबलीकरण आणि सशक्तीकरण या कार्यशाळेचे आयोजन दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ ते १८ फेब्रुवारी २०२२ या कालावधीमध्ये आभासी(online)व प्रत्यक्ष(Offline) पद्धतीनेकरण्यात आले.विद्यार्थीनींना शिक्षणाबरोबर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक,आर्थिक गोष्टीचे आकलन व्हावे.विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास व्हावा, काळानुसारबदलणाऱ्याआव्हानांनासामोरेजाण्यासाठीक्षमता निर्माण व्हावी, त्यांना आपले विचार मांडण्यासाठीं खुले व्यासपीठ मिळावे हेया कार्यशाळाआयोजनामागचे प्रयोजनहोते. या कार्यशाळेमध्ये खालील मान्यवराचे मार्गदर्शन लाभले.

दिनांक १५ फेब्रुवारी २०२२या दिवशी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गायकवाड यांनी या कार्यशाळेचे उद्घाटन करून शुभेच्छा दिल्या तसेच महाविद्यालयातील विद्यार्थीनिनीआपल्या स्वप्नाचे पंख पसरून क्षितिजापर्यंत गवसणी घालावीव आपली स्वप्न साकार करावीत व स्वप्नपूर्तीसाठीमहाविद्यालय सदैव तत्पर असेल असे आश्वासन दिले.

प्रा.रजनीजराडे यांनी "क्षितीजाला गवसणी घालताना...." या विषयी विद्यार्थिनींनामार्गदर्शनकरत असताना स्वतःच्या स्वप्नांना इतकी उंच भरारी द्या ज्यातून क्षितिज देखील ठेंगणे वाटेल. स्वतःच्या आत्मविश्वासाच्या जोरावर एक स्त्री किती उंच भरारी घेऊ शकते हे सिंधुताईसपकाळआणि लता मंगेशकर यांच्या जीवनातील विविध पैलूंच्या आधारे स्पष्ट केले.प्रा.ज्योती शिंदे यांनी "आर्थिक साक्षरता:महिला सबलीकरणाचा पाया" या विषयी मार्गदर्शन करताना विद्यार्थीनींनी आजच्या आधुनिक काळात वावरत असताना आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे आहे.बँकामध्ये महिलासाठी असलेल्या विविध संधी, बचत योजना, गुंतवणूक करण्याच्या पद्धती सांगितल्या.सदर व्याख्यानाचामहाविद्यालयातील एकूण ७५ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.दिनांक १६ फेब्रुवारी २०२२ या दिवशी डॉ. सविता कुलकर्णी यांनी व्यक्तिमत्व विकास करताना महाविद्यालय, समाज, आणि कुटुंब यांचे महत्व सांगितले. तसेच व्यक्तिमत्व घडविताना बाह्य व अंतर्गत व्यक्तिमत्व पूर्णपणे उलगडे असते, हे विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले.राष्ट्रीय सेवा योजनामुळेव्यक्तिच्या अंगी असलेले विविध कलागुण, कौशल्य, सामाजिक बांधिलकी यांची विद्यार्थ्यांना जाण होते हे राष्ट्रीय सेवा योजना आणि व्यक्तिमत्व या विषयांतर्गतसांगितले.

महाविद्यालयातील प्रा.डॉ.दिपकसुरवसे राष्ट्रीय सेवा योजना आणि जडणघडण यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांची जडणघडणहोण्यास विद्यार्थी आत्मविश्वास संपादन करून समाजातील नवीन आव्हाने पेलण्यास, समाजातील प्रत्येक घटकास मदत करण्यास सदैव तत्पर असतो. त्यामुळे महाविद्यालयीनदशेत असताना प्रत्येक विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचा भाग असावा असे आवाहन केले. सदर व्याख्यानाचा महाविद्यालयातील एकूण ६३ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ प्रा. डॉ. अमित गोसावले यांनी"यशाची पहिली पायरी-राष्ट्रीय सेवा योजना" या विषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते स्वतः विद्यार्थी असताना राष्ट्रीय सेवायोजनेचा भाग असल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वात भर घालणारे संभाषण कौशल्य, निर्णय क्षमता,लोककला सादरीकरण अशा विविध पैलूंचे दर्शन घडून त्या गोष्टी त्यांनी आत्मसात करून विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतून एक यशस्वी वाटचाल करण्याबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. नाना शेजवळकर"राष्ट्रीय सेवा योजना आणि औद्योगिक संधी"या विषयी माहिती देत असताना राष्ट्रीय सेवा योजना हा आवडीचा विषय नसून सवडीचा विषय आहे.औद्योगिकक्षेत्रामध्ये असणाऱ्या संधीचा वापर करताना राष्ट्रीय सेवा योजनेचीमहत्वाची भूमिका स्पष्ट केली. दिनांक१८ फेब्रुवारी २०२२या दिवशी विद्यार्थीनींना "खुले व्यासपीठ – मला काही बोलायचे...." या संकल्पनेद्वारेमुलींनी आधुनिक स्त्रियांची बदलती परिस्थिती, स्त्रीचा खरा शत्रू कोण?, लव मॅरेजकी अरेंजमॅरेज, भावी जोडीदार,आधुनिक सामाजिक प्रसार माध्यमांचे स्त्रीसाठी बदललेली रूपे या विषयावर स्वतःची मते मांडली.

८ मार्च जागतिक महिला दिन

रा.भू.मा.ऊर्फअप्पासाहेबजाधवमहाविद्यालयातीलभूगोलविभागामध्येदिनांक८मार्च यादिवशीजागतिक महिला दिनसाजराकरण्यातआला.महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो.महिला हा समाजाचा एक महत्वाचा घटक आहे आणि काळाच्या ओघात महिला समाजाचा आणि राष्ट्र उभारणीचा महत्वाचा भाग बनल्या आहेत. घर आणि कुटुंबच जगमानणाऱ्यास्त्रिया बाहेर सर्व क्षेत्रात गेल्या तेव्हा त्यांना अभूतपूर्व यश मिळू लागले. खेळापासून ते मनोरंजनापर्यंत आणि राजकारणापासूनलष्कर आणि संरक्षण मंत्रालयापर्यंत महिलांचा केवळ सहभागच नाही तर त्यामध्ये त्या मोठी व नाविन्यपूर्ण भूमिका बजावत आहेत.

4

१९ फेब्रुवारी शिवजयंती उपक्रम – छत्रपती शिवाजी महाराज जयंती मध्ये रा. से. यो विभागातील २ विद्यार्थिनी राजमाता जिजाऊ यांची भूमिका

८ मार्च जागतिक महिला दिन

स.भू.या.उर्फ अप्पासाहेब जेधे महाविद्यालयातील भूगोल विभागामध्ये दिनांक ८ मार्च यादिवशी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. महिला हा समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे आणि काळाच्या ओघात महिला समाजाच्या आणि राष्ट्र उभारणीचा महत्त्वाचा भाग बनल्या आहेत. घर आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांव्यतिरिक्त बाहेर सर्व क्षेत्रात गेल्या तेव्हा त्यांना अभूतपूर्व यश मिळू लागले. खेळापासून ते मनोरंजनापर्यंत आणि राजकारणापासून ते आणि संरक्षण मंत्रालयात महिलांचा केवळ सहभागच नाही तर त्यामध्ये त्या मोठी व नाविन्यपूर्ण भूमिका बजावत आहेत.

महिला दिनाचे औचित्य साधून भूगोल विभागामध्ये महिला दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील महिला प्राध्यापकांनी जिजाऊमाता यांच्या प्रतिमेस पुष्प हार घालून या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. महिलांचा सन्मान केवळ एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता प्रत्येक दिवशी असा सन्मान होणे आवश्यक आहे. महिला दिनाचा इतिहास, महिलांचा सर्वांगीण विकास, आर्थिकदृष्ट्या महिला सक्षमीकरण, महिलांचा आदर करण्याची सुरुवात स्वतःच्या घरापासून करावी यासारखे विचार महिला प्राध्यापकांनी मांडले. यावेळी जिजामाता मूर्तीचे हायस्कूलमधील आणी गायकवाड या विद्यार्थिनीचा पुस्तक देऊन सन्मान केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. शिवाजी पाचारणे यांनी तर प्रा. ... आरेकर यांनी कार्यक्रमाचे आभार मानले व सर्व महिला प्राध्यापक व विद्यार्थीनींना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

२२ मार्च जल साक्षरता दिन.- पाण्याचे महत्त्व या विषयावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रा. ... आरेकर यांनी पाणी हेच जीवन आणि ते जपून कसे वापरावे याबद्दल माहिती दिली. डॉ. शिवाजी पाचारणे यांनी पाण्याचे व्यवस्थापन या बद्दल मार्गदर्शन केले.

प्लास्टिक फ्री क्याम्पस :- २२ मार्च २०२२ महाविद्यालयाच्या परिसरातील प्लास्टिक रा. से. यो. स्वयंसेवक यांच्या मदतीने संकलित केले. तसेच प्लास्टिक चा धोका, त्याचा कमीत कमी वापर आणि कचऱ्याचे व्यवस्थापन या बद्दल जनजागृती करण्यात आली.

युवक युवती उन्नयनिकरण कार्यक्रम अंतर्गत एक दिवसीय विद्यापीठ स्तरीय पथनाट्य प्रशिक्षण व सादरीकरण कार्यशाळा मतदार जागृती अभियान ( मतदान जागृती अभियान) - शुक्रवार दिनांक २५ मार्च २०२२

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सहयोगाने स.भू.या.उर्फ अप्पासाहेब जेधे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत दिनांक २५ मार्च २०२२ रोजी युवक युवती उन्नयनिकरण कार्यक्रम अंतर्गत एक दिवसीय विद्यापीठ स्तरीय पथनाट्य प्रशिक्षण व सादरीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेमध्ये एकूण पुणे व पिंपरी परिसरातील १३ महाविद्यालयातील १८२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रथम व द्वितीय सत्रामध्ये प्रा. अरुण शिंदे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन केले. उद्घाटन प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना पथनाट्याची सुरुवात जितकी प्रभावी तितकाच त्याचा शेवट देखील तितकाच प्रभावी असणे आवश्यक आहे, हे त्यांचे अनुभव अभिनयातून साकार करून दाखविले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गायकवाड यांनी अध्यक्षस्थान प्रस्तुत बोलताना राष्ट्रीय सेवा योजनेतून युवकांना या प्रकारचा मंच उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे. यातून तरुण पिढी समाजाला चांगला मार्ग दाखवू शकते आणि या साठी तरुणाच्या हातात पथनाट्य या सारखे उत्कृष्ट माध्यम आहे. या सत्राचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. नितीन मोरे रितेश पाटील यांनी पथनाट्यामध्ये कोणत्या महत्त्वाच्या गोष्टी असाव्यात हे सांगितले. सामाजिक प्रश्नांची निवड व त्या साठी उत्तराचा पर्याय तसेच आपले पथनाट्य लोकांच्या आणीवेला हात घालणारे असावे आणि समाजभान निर्माण करणारे असावे असे मत जिल्हा समन्वयक डॉ. शिवाजी पाचारणे यांनी मांडले.

तृतीय सत्रामध्ये कार्यशाळेमध्ये सहभागी झालेल्या महाविद्यालयाच्या पथनाट्याची स्पर्धा पार पडली यामध्ये एकूण ८ संघांनी सहभाग नोंदवला होता. मतदान जागृती, डिजिटल शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन यासारखे विषय पथनाट्याच्या सादरीकरणासाठी देण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये प्रथम ३ क्रमांक व २ सप उत्तेजनार्थ म्हणून निवडण्यात आले. प्रथम पारितोषिक श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाने पटकावला.

वरील प्रकारचे सर्व कार्यक्रम आयोजनासाठी श्री शिवाजी मराठा सोसायटीचे सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. संजय गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. संयोजक म्हणून डॉ. शिवाजी पाचारणे यांनी जबाबदारी सांभाळली. डॉ. दीपक मुरदसे, डॉ. विशाल गायकवाड, डॉ. अमित गोसावले, प्रा. रजनी जराडे यांनी कार्यक्रम अधिकारी म्हणून तर डॉ. मंगेश जाधव, डॉ. संतोष यादव, डॉ. धनाजी भिसे, प्रा. ज्योती शिंदे, व सोनाल खरटमल प्रा. शितल गायकवाड, प्रा. स्नेहल जगताप, प्रा. शीमा कापडे यांनी समिती सदस्य म्हणून उत्कृष्ट नियोजन केले.

डॉ. शिवाजी पाचारणे
(जिल्हा समन्वयक, कार्यक्रम अधिकारी)

डॉ. दिपाली रा. पाटील
प्रभारी प्राचार्य
स.भू.या. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२.



16